॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

अभ्यासमंडळ विभाग

जा.क्र. कबचौउमवि/२१/पदव्यूत्तर अभ्यासक्रम /१८४/२०२० दि. २७.०७.२०२०

प्रति,

**कबचौउमवि. संलग्नीत सर्व महाविद्यालये / परिसंस्था,**

यांचे मा. प्राचार्य / मा. संचालक / विभागप्रमुख,

यांना..

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये पदव्यूत्तर (एम.एस्सी /एम.ए/ एम.कॉम भाग -१) अभ्यासक्रम आणि एम.बी.ए भाग-१, एम.एम.एस (कॉम्प्यूटर मॅनेजमेंट भाग-१), एम.एम.एस (पर्सनल मॅनेजमेंट भाग-१), एम.बी.ए भाग-१ (इंटीग्रेटेड), एम.एस.डब्ल्यू भाग-१, वर्गांच्या अभ्यासक्रमांमध्ये कोणताही बदल न करता तसेच कायम ठेवण्याबाबत..

महोदय/ महोदया,

आपणास विदीतच आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गाकरीता पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती (C.B.C.S) व शै.वर्ष १९-२० पासून व्दितीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान च्या वर्गा करीता पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती (C.B.C.S) लागू करण्यात आली असून नैसर्गिक दृष्टया शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून तृतीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञानच्या वर्गांकरीता पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती (C.B.C.S) लागू करण्यात येत आहे.

या अनुषंगाने आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून **एम.एस्सी / एम.ए / एम.कॉम भाग -१, एम.बी.ए भाग-१, एम.एम.एस (कॉम्प्यूटर मॅनेजमेंट भाग-१), एम.एम.एस (पर्सनल मॅनेजमेंट भाग-१), एम.बी.ए भाग-१ (इंटीग्रेटेड), एम.एस.डब्ल्यू भाग-१** या वर्गांचे अभ्यासक्रम बदलणार होते.

परंतू शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये तृतीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गांकरीता **पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती (C.B.C.S)** अभ्यासक्रम लागू होत असल्याने या वर्गांचे विद्यार्थी **शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१** मध्ये C.B.C.S नुसार अंतिम वर्षाची परीक्षा देणार आहेत. त्यामुळे अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२१ मध्ये पदव्यूत्तर अभ्यासक्रम **पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती नुसार** तयार करणे आवश्यक आहे.

तेव्हा, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हीत लक्षांत घेवून, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये **पदव्यूत्तर (एम.एस्सी /एम.ए/ एम.कॉम, भाग-१)** वर्गांच्या अभ्यासक्रमांसह **एम.बी.ए भाग-१, एम.एम.एस (कॉम्प्यूटर मॅनेजमेंट भाग-१), एम.एम.एस (पर्सनल मॅनेजमेंट भाग-१), एम.बी.ए भाग-१ (इंटीग्रेटेड), एम.एस.डब्ल्यू भाग-१,** वर्गांच्या अभ्यासक्रमांमध्ये कोणताही बदल न करता तसेच कायम ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त बाब, आपल्या महाविद्यालयांतील अधिनिस्थ असलेले अध्यापक, प्राध्यापक तसेच महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

कक्ष अधिकारी
अभ्यास मंडळ व प्रवेश पात्रता विभाग

**सोबत :** अभ्यासक्रमांची यादी .

प्रत माहितीसाठी :-१) मा. कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव. २) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.३) मा.प्र.कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव. ४) मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव. ५) मा.जनसंपर्क अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव. ६) ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

## अभ्यासमंडळ विभाग

जा.क्र. कबचौउमवि/२१/प्रथम वर्ष बी.ए-बी.कॉम-बी.एस्सी् अभ्यासक्रम /३७ / २०२१ दि. १५.०६.२०२१

प्रति,
**कबचौउमविशी संलग्नीत**
**सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचे**
**मा. प्राचार्य यांना..**

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये प्रथम वर्ष बी.ए , बी.कॉम आणि बी.एस्सी (पसंतीवर आधारीत श्रेयांक पध्दती) (C.B.C.S) पदवी वर्गांच्या अभ्यासक्रमांमध्ये कोणताही बदल न करता तसेच कायम ठेवण्याबाबत..

**महोदय/ महोदया,**

आपणास विदीतच आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गांकरीता **पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती** (C.B.C.S) लागू केली आहे. त्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये तृतीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गांचे विद्यार्थी पदवी घेऊन उत्तीर्ण होणार आहे.

या अनुषंगाने, नैसर्गिक रित्या शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान अभ्यासक्रम बदलणार होता परंतू शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये **एम.एस्सी् / एम.ए / एम.कॉम भाग -१, एम.बी.ए भाग-१,एम.एम.एस(कॉम्प्यूटर मॅनेजमेंट भाग-१),एम.एम.एस (पर्सनल मॅनेजमेंट भाग-१), एम.बी.ए भाग-१ (इंटीग्रेटेड), एम.एस.डबल्यू भाग-१** वर्गाचे अभ्यासक्रम **पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती** ( C.B.C.S) लागू करण्यात येत आहे.

या शिवाय कोविड-१९ चा प्रादुर्भावामुळे प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान अभ्यासक्रम पुनर्रचना पुढच्या वर्षी (शैक्षणिक वर्ष २०२२-२३) करावी अशी शिफारस मा.प्रभारी अधिष्ठाता यांनी एकमताने केली. ही शिफारस दि.२७.०५.२०२१ रोजी झालेल्या मा.विद्या परिषद ऑनलाईन सभेत विचारार्थ ठेवण्यात आली असता. सभेत खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**ठराव वि.प.ए-५२ /२०२१, दि.२७.०५.२०२१**

**क.ब.चौ.उ.म.वि. अंतर्गत येणा-या सर्व कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयांसाठी शै.वर्ष २०१८-१९ मध्ये लागू करण्यात आलेला प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान वर्गाचा पसंतीवर आधारीत श्रेयांक पदध्ती (C.B.C.S) अभ्यासक्रम हा शैक्षणिक वर्ष २१-२२ करीता जशाचा तसा लागू करण्याबाबत मा.अधिष्ठाता मंडळाने केलेल्या शिफारशींच्या अधिन राहून मान्यता द्यावी, असे सर्वानुमते ठरले.**

तेव्हा वरील ठरावाच्या अनुषंगाने, आपल्या निदर्शनास आणून देण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता प्रथम वर्ष बी.ए , बी.कॉम आणि बी.एस्सी (पसंतीवर आधारीत श्रेयांक पध्दती) (C.B.C.S) पदवी वर्गांच्या अभ्यासक्रमांमध्ये कोणताही बदल न करता तसेच कायम ठेवण्यात येत आहे.

तरी उपरोक्त बाब, आपल्या महाविद्यालयांतील अधिनिस्थ असलेले अध्यापक, प्राध्यापक तसेच महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिकारी /कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून द्यावी ही विनंती.

कळावे.

आपला विश्वासू,

**कक्ष अधिकारी**
अभ्यास मंडळ व प्रवेश पात्रता विभाग

**प्रत माहितीसाठी :**१) मा. कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
२) मा. प्र-कुलगुरु कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
३) मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, क.ब.चौ.उ.म.वि.,जळगाव.
४) मा.प्र.अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, मानव्यविज्ञान विद्याशाखा, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव.
५) ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगांव.